| Published Date: | 4 Oct 2018 | Publication: | Pune Metro (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Pune | Page No: | 3 |
| MAV/CCM: | 968.4/2.69 | Circulation: | 14000 |

# बिशप्स शाळेतील अनिकेत. सी आणि अनिरुद्ध देब यांनी जिंकली टीसीएस आयटी विझ २०१८ची पुणे आवृत्ती

पुणे. : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने आयोजित केलेल्या टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजुषेत पुण्यातील १,००० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला. ४ ऑक्टोबर रोजी पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांमध्ये सक्षम करणाऱ्या तंत्रज्ञान कौशल्यांच्या वाढत्या महत्वाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही खडतर स्पर्धा वार्षिक ज्ञान स्पर्धेच्या रूपात चालवली जाते. प्रत्येक शाळा दोन-दोन विद्यार्थ्यांचे कितीही संघ यात पाठवू शकते. यासाठी प्रवेश फी नाही. यंदाच्या टीसीएस आयटी विझमध्ये टेक ट्रेंड्सचा समावेश होता. ॲनिमेशन सॉफ्टवेअरचा वापर करून गेमिफिकेशनच्या माध्यमातून सादर केलेल्या या टेक ट्रेंड्सने प्रेक्षक आणि संघांना जागेवर खिळवून ठेवले. या स्पर्धेत पाच फेऱ्या होत्या - मास पर्सनलायझेशन, लेव्हरेजिंग इकोसिस्टम्स, क्रीएटिंग एक्सपोनेन्शिअल व्हॅल्यू आणि एम्ब्रेसिंग रिस्क.